ISSN : 0974-3065

।। नामूलं लिख्यते किञ्चत् ।।

# इतिहास दर्पण

# ITIHAS DARPAN

विशेष अंक : फेब्रुवारी २०२५

UGC-CARE List Journal

कलियुगाब्द ५१२७, विक्रम संवत् २०८१, ईसवी सन् २०२५

Kaliyugabda 5127, Vikrama Samvat 2081, i.e. CE 2025



अखिल भारतीय इतिहास संकलन योजना

बाबा साहेब आपटे स्मृति भवन, 'केशव कुञ्ज', झण्डेवाला, नयी दिल्ली– ११० ००५

AKHIL BHARATIYA ITIHASA SANKALANA YOJANA

Baba Saheb Apte Smriti Bhawan, 'Keshav Kunj', Jhandewalan, New Delhi-110 005

ISSN: 0974-3065

।। नामूलं लिख्यते किञ्चित् ।।

# इतिहास दर्पण

# ITIHAS DARPAN

विशेष अंक : फेब्रुवारी २०२५

**कलियुगाब्द ५१२७, विक्रम संवत् २०८१, ईसवी सन् २०२५**

**Kaliyugabda 5127, Vikrama Samvat 2081, i.e. CE 2025**

मुख्य संपादक

डॉ. सुश्मिता पांडे

संपादक

डॉ. रत्नेश कुमार त्रिपाठी

डॉ. नरेंद्र शुक्ल

इतिहासः कुशाभासः सूकरास्यो महोदरः ।
अक्षसूत्रं घटं विभ्रत्पंकजाभरणान्वितः ॥

नामूलं लिख्यते किञ्चित्

Jayprakash Education Society's
**Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya**
Peth Vadgaon, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur 416112
Department of History, IQAC & **Akhil Bharatiya Itihas Sankalan Yojana**,
New Delhi (Western Region)
Organize
**ICSSR Western Region Mumbai, Sponsored**
One Day National Seminar
On

## Indian Knowledge System and Multidisciplinary Holistic Education in India

**अखिल भारतीय इतिहास संकलन योजना**

**बाबा साहेब आपटे स्मृति-भवन, 'केशव-कुञ्ज', झण्डेवाला, नयी दिल्ली- ११० ००५**

**AKHIL BHARATIYA SANKALAN YOJANA**

**Baba Saheb Apte Smriti Bhawan, 'Keshav Kunj', Jhandewalan, New Delhi-110 005**

# ITIHAS DARPAN

**विशेष अंक मार्च २०२४**

**Kaliyugābda 5125, Vikrama Saṁvat 2080, i.e. CE 2024**

***Published by :***

**AKHILA BHĀRATĪYA ITIHĀSA SAṄKALANA YOJANĀ**

Baba Saheb Apte Smriti Bhawan, Keshav Kunj,
Jhandewalan, New Delhi-110 055
**Ph.:** 011-23385670
**e-mail:** darpan.itihas@gmail.com
**Visit us at :** www.abisy.org
www.facebook.com/akhilabharatiyaitihasasankalanayojana
www.facebook.com/itihasdarpan


**© Copyright :** Publisher


Subscription:
Institutions : ₹ 5,000.00 (Fifteen years)
Individual : ₹ 3,000.00 (Fifteen years)

Subscription be sent by D.D. or cheque in favour of 'Itihas Darpan', to

Dr. Balmukund Pandey
Akhil Bharatiya Itihas Sankalan Yojana,
Baba Saheb Apte Smriti Bhavan, Keshav Kunj,
Desh Bandhu Gupta Marg, Jhandewalan, New Delhi -110 055


**THE RESPONSIBILITY FOR THE FACTS STATED OR OPINIONS EXPRESSED IN THIS PEER REVIEWED JOURNAL IS ENTIRELY OF THE AUTHOR AND NOT OF THE ABISY.**


**This Journal is a referral volume and in UGC-CARE Journal ID-101002593**

Typescripts whether in the form of articles of notes or book reviews, offered for publication, should be sent to the editors at

**Prof. Susmita Pande**
Former Chairperson, National Monument Authority
Flat No. 607/Block-12, Kailash Dham, Sector-50, Noida-201301

**Dr. Narendra Shukla**
(Project Coordinator, Comprehensive History of Bharat ICHR, New Delhi)
BH-702, Abhimanyu Apartment,
Vasundhara Enclave, Delhi-110096
M. 9560737977

**Dr. Ratnesh Kumar Tripathi**
(Asst. Professor, Satyawati College, University of Delhi)
86-A, Shri Harihar Apartment
Ashok Vihar, Phase-II, Delhi-110052
M. 9210312911

We prefer CD/DVD of the article with details, including illustrations, preferably in MS Word or e-mail **(darpan.itihas@gmail.com)** with illustrations and tables etc.

The editors are not responsible for the opinions expressed by the contributors.

**Printed by :** Printech International, A-6/D, Jhilmil Industrial Area, Delhi-110095, (printechinternational@gmail.com)

# UGC Journal Details

| | | |
|---|---|---|
| Name of the Journal | : | Itihas Darpan |
| ISSN Number | : | 09743065 |
| e-ISSN Number | : | - |
| Source | : | UNIV |
| Subject | : | Archaeology; Architecture; Cultural Studies; Philosophy; Religious studies; Social Sciences (all),Visual Arts and Performing Arts |
| Publisher | : | Akhila Bharatiya Itihasa Samkalana Yojana |
| Country of Publication | : | India |
| Broad Subject Category | : | Arts & Humanities; Social Science |

सुमन केंद्रे
40. **भारतीय ज्ञानप्रणालीच्या प्रसारातील मराठी भाषेची भूमिका** 163-166
दया जेठे
41. **भारतीय ज्ञान परंपरेचा केंद्रबिंदू नालंदा विद्यापीठ** 167-171
रविराज कांबळे
42. **जैन दर्शन शास्त्राची प्राचीनता व तत्त्वज्ञान याचे आकलन** 172-175
सचिन कांबळे
43. **प्राचीन ते आधुनिक वृत्त देण्याच्या पद्धतीतील बदलाची चिकित्सा** 176-180
धीरज शिंदे
44. **भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास: एक ऐतिहासिक दृष्टिकोन** 181-184
तेजश्री सरकाळे
45. **भारतीय ज्ञान परंपरा आणि मध्ययुगीन संतविचार** 184-188
सर्जेराव पद्माकर
46. **संत रामचंद्र महाराज (लालाजी) महाराज यांची वैश्विक सहजमार्ग साधना प्रणाली** 189-194
सुशांत कदम
47. **भातीय ज्ञान परंपरा विकासातील औंध संस्थांचे योगदान आणि महत्व** 195-199
करीम मुल्ला
48. **प्राचीन भारतीय विद्यापीठातील शिक्षण पद्धती: विशेष संदर्भ तक्षशीला विद्यापीठ** 200-207
अनिल कुंभार
49. **वारकरी संप्रदाय: ज्ञान, भक्ती व योग परंपरा** 208-214
अर्चना जाधव
50. **योग परंपरा इतिहास आणि महत्व** 215-218
अमृता जाधव
51. **प्राचीन भारतीय अर्थविज्ञान आणि कौटिलीय अर्थशास्त्र** 219-222
संदीप अभंग
52. **मध्ययुगीन भारतीय भक्ती संप्रदायातील मानवतावादी विचाराचे वैश्विक अस्तित्व** 223-228
हाजी नदाफ
53. **प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेतील वैद्यकशास्त्र: एक ऐतिहासिक रूपरेषा** 229-231
सचिन धेंडे
54. **भारतीय वैध्यकीय शल्यचिकित्सेचे जनक आचर्य शुश्रुत** 232-236
रणजीत माने
55. **भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात दुर्ग स्थापत्य एक अभ्यास** 237-241
सर्जेराव बनसोडे
56. **Orientalism and Indian History** 242-247
Mahadev Sontakke
57. **Historical Developments of Indigenous Knowledge Systems in India** 248-249
Ravi Satbhai
58. **Development of Indian Knowledge System in Bombay Karnataka** 250-254
Roopa Yaligar
59. **Economic Ideas of Ancient Indian Thinkers: Contributions to Employment And Development** 255-258
Karuna Anande
60. **Need Of Adhering to Buddhaâs Principles in The Changing Scenario** 259-261

# भारतीय ज्ञान परंपरा विकासातील औंध संस्थानचे योगदान आणि महत्व

करीम मुल्ला
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज
कोल्हापूर

**प्रस्तावना:**

औंध संस्थान हे महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक संस्थान होते. ज्याची स्थापना सन १६९८ साली झाली. ब्रिटिश भारताच्या मुंबई इलाख्यातील डेक्कन स्टेट्स एजन्सीमध्ये याचा समावेश होता. प्रारंभीची राजधानी कराड येथे होती, परंतु नंतर ती औंध येथे स्थलांतरित झाली. विसाव्या शतकातील औंध संस्थानाचे शासक, विशेषतः श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी, हे कला, संस्कृती आणि शिक्षणाच्या क्षेत्रात अत्यंत प्रगतिशील होते.. भारतीय ज्ञान परंपरेच्या संवर्धनात औंध संस्थानाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी भारतीय कला, संगीत, साहित्य आणि शिक्षणाच्या विविध अंगांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली, संस्थानात पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक शिक्षण यांचा समन्वय साधण्यात आला, ज्यामुळे भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार झाला.औंध संस्थानाच्या या प्रयत्नांमुळे भारतीय ज्ञान परंपरेचे विविध पैलू विकसित झाले. त्यांच्या या योगदानामुळे संस्थानाने भारतीय सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे दिसून येते.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे विद्या, कला आणि संस्कृतीचे मोठे संरक्षक होते. इतकेच नव्हे तर ते उत्तम, सिद्धहस्त लेखक, तसेच व्याख्याते होते. त्यांनी धार्मिक, ऐतिहासिक, ललित, वैचारिक, सांस्कृतिक, चित्रकला, शिल्पकला, आहारशास्त्र, व्यायामशास्त्र आदी चौफेर घटकांवर विपूल प्रमाणात लेखन केले आहे. तसेच त्यांनी स्वतःचे आत्मचरित्रही दोन खंडात लिहिले आहे. मराठी साहित्यामध्ये त्यांच्या लेखनाने मोलाची भर घातली आहे. त्यांनी विविध क्षेत्रातील अनेक ख्यातनाम विद्वानांना संस्थानात आश्रय दिला होता. प्रस्तुत शोधनिबंध औंध संस्थानात सुमारे शतकापूर्वी प्रागतिक दृष्टीने भारतीय ज्ञान परंपराचा मोठ्या प्रमाणात प्रचार आणि प्रसार केल्याचे दिसून येते. औंध मध्ये वेदाभ्यास, चित्रकला, शिल्पकला, व्यायामशास्त्र (सूर्यनमस्कार), अध्यात्मिक, आदी भारतीय ज्ञान परंपरांचा कशा प्रकारे विकास केला याचा आढावा प्रस्तुत अभ्यासात घेतला आहे. भारतीय ज्ञान प्रणालीचे विविध घटक औंध संस्थानात कसे विकसित केले, याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात ऐतिहासिक संशोधन पद्धतीने करण्यात आला आहे.प्राथमिक व दुय्यम साधनाचा आधार घेऊन संकलित माहितीचे ऐतिहासिक सांस्कृतिक दृष्टीकोनातून विश्लेषण केलेले आहे.बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी आपल्या सत्ताकाळात प्राचीन वेदाभ्यास, चित्रकला, शिल्पकला, योग अभ्यास (सूर्यनमस्कार), साहित्य –लेखन, कला-संगीत या प्राचीन ज्ञान परंपरांचा विकासासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. याचा संपूर्ण अभ्यास सविस्तर,पद्धतशीर आणि सुसंबद्धपद्धतीने मांडण्यात आला आहे. ,

**वेदाभ्यास :**

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी विविध क्षेत्रातील अनेक ख्यातनाम विद्वानांना संस्थानात आश्रय दिला होता. पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर हे त्यापैकीच एक होते. पं. सातवळेकरांना सहकार्य देऊन वेदसंवर्धन आणि अध्ययनासाठी 'स्वाध्याय मंडळ औंध' या संस्थेची स्थापना केली होती. हे एक प्रकारचे वैदिक शिक्षण आणि संशोधन केंद्र होते. येथे वेद, उपनिषदे, गीता आणि वेदांत यांचा अभ्यास केला जात असे. लोकांमध्ये वेदाध्ययन आणि स्वाध्यायाची आवड निर्माण करण्यासाठी ग्रंथ, व्याख्याने आणि प्रशिक्षण वर्ग चालवले जात असत. भारतीय ज्ञानपरंपरेमधील वैदिक अर्थात वेदाभ्यासला मोठ्या प्रमाणात चालना दिली. त्यांनी संपूर्ण आयुष्य वेदांचा अभ्यास, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी समर्पित केले. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी पं. सातवळेकर यांच्या कडून भारताच्या प्राचीन वेद - उपनिषद यांचे मराठी –हिंदी मध्ये भाषांतराचे महत्वपूर्ण कार्य करवून घेतले केले. त्यांनी वेदांचे मराठीत आणि हिंदीत सुबोध भाषांतर केले. वेदांचा मूलभाव आणि त्यांचे आधुनिक उपयोग यावर त्यांनी विशेष संशोधन केले. संस्कृत आणि हिंदू तत्त्वज्ञान, भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. उपनिषदे, गीता आणि वेदांत यांचा सखोल अभ्यास केला. 'स्वाध्याय मण्डळ' आणि 'वेदांत भाष्य' या उपक्रमांतून त्यांनी वैदिक तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवले. वेदप्रकाश, गीता रहस्य,

वेदांचे स्वाध्याय, भाष्य, हिंदू संस्कृती आणि जीवनदर्शन पं. सातवळेकर यांनी भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती, वेद आणि समाजोद्धार यासाठी अमूल्य योगदान दिले. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही वेद-अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांवर आणि भारतीय तत्त्वज्ञानावर आहे. पं. सातवळेकर आणि औंध संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने वेदसंवर्धन, शिक्षण, संशोधन आणि प्रकाशन या क्षेत्रांत मोठे कार्य झाले.औंध संस्थानाची वैदिक परंपरा आणि पं. सातवळेकरांचे योगदान यामुळे महाराष्ट्र आणि भारतभर वेदाध्ययनाच्या नव्या संधी निर्माण झाल्या .यासाठी तेथे राजा भवानरावांच्या पाठिंब्याने औंध संस्थानात वेदाध्ययनासाठी खास 'वेदशाळा' स्थापन करण्यात आली. येथे वैदिक संहिता, ब्राह्मण ग्रंथ, उपनिषदे आणि अन्य शास्त्रांचा अभ्यास केला जाई. पं. सातवळेकर यांनी वेदांचे सोपे आणि सुबोध भाषांतर करण्यासाठी अनेक ग्रंथ लिहिले आणि प्रकाशित केले.औंध संस्थानाने या ग्रंथांचे प्रकाशन आणि वितरण केले, जेणेकरून सामान्य लोकांपर्यंत वेदांचा ज्ञानसागर पोहोचवण्याचे कार्य केले. इतकेच नव्हे तर वैदिक तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी विविध मान्यवरांची औंधमध्ये पं. सातवळेकरांनी विविध व्याख्याने आणि शिबिरे आयोजित केली, जिथे लोकांना वेदांचा खरा अर्थ समजावून सांगितला जात असे. त्यांनी वेद आणि विज्ञान यांच्यातील संबंध स्पष्ट करणाऱ्या चर्चा घडवून आणल्या. या उपक्रमांमुळे केवळ पुजारी किंवा विद्वानच नव्हे, तर सामान्य जनतेमध्येही वैदिक शिक्षणाची रुची निर्माण झाली.तसेच सन १९२३ मध्ये 'भारत मुद्रणालय'नावाचा छापखाना सुरु केला. सन १९२४ मध्ये 'पुरुषार्थ'हे मासिक सुरु केले. वेदाभ्यास आणि वेद माहिती प्रसारित करण्यासाठी सन १९३३ मध्ये 'वैदिक धर्म' तसेच 'गीता'हे हिंदी भाषिक 'श्रीमद्भगवतगीता' हे मराठी भाषेमध्ये मासिक सुरु केले. इतकेच नव्हे तर स्वदेशी व स्वावलंबनावर भर देऊन औंध संस्थानात पं. सातवळेकरांनी स्वदेशी चळवळीला वैदिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून समर्थन दिले. त्यांनी भारतीय संस्कृतीतील कृषी, व्यापार आणि स्वावलंबन यांचे महत्त्व पटवून दिले. पारंपरिक भारतीय कृषिपद्धती आणि गोपालन (गाय-पालन) यावर त्यांनी विशेष भर दिला. विद्यार्थ्यांसाठी वेदाध्ययन शिबिरे आणि स्पर्धा औंधमध्ये वैदिक शिक्षण आणि संस्कार वृद्धिंगत करण्यासाठी वेद-पठण स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि व्याख्यानमाला घेतल्या जात. यातून तरुण पिढीमध्ये भारतीय संस्कृती आणि वेदांचा अभ्यास करण्याची आवड निर्माण झाल्याचे दिसून येते. पं. सातवळेकर आणि औंध संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने वेदसंवर्धन, शिक्षण, संशोधन आणि प्रकाशन या क्षेत्रांत मोठे कार्य झाले. औंध संस्थानाची वैदिक परंपरा आणि पं. सातवळेकरांचे योगदान यामुळे महाराष्ट्र आणि भारतभर वेदाध्ययनाच्या नव्या संधी निर्माण झाल्या.

**चित्रकला व चित्रकलेस उत्तेजन :**

भारतीय चित्रकला हि प्राचीन काळापासूनच समृद्ध आणि वैविध्यपूर्ण राहिली आहे.याचा विकास विविध कालखंडात वेगवेगळ्या शैलीमध्ये राहिली आहे. स्वतः बाळासाहेब पंतप्रतिनिधी एक श्रेष्ठ चित्रकार होते. स्वतः चित्रे काढण्याबरोबरच दुसऱ्यांच्या चित्रांचे रसग्रहण करण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त होते. इतरांचे अनुकरण न करता स्वतःची स्वतंत्र शैली त्यांनी विकसित केली होती. पाश्चिमात्य, मोगल, राजपूत, कलांची असंख्य चित्रे त्यांनी संग्रहित केली होती. आजही तो औंधमधील श्री भवानी चित्र संग्रहालयात पाहावयास मिळतो. रेषाचित्र, रंगचित्र इ. बाबतीत अनेक ग्रंथात त्यांनी लेखनही केले आहे. बाळासाहेबांनी अनेक नामवंत चित्रकारांना आश्रय दिला. औंध संस्थानातील गुणदाळ तालुक्यातील कोट्याळ गावचे एक खेडेगाव होते. तेथील बरम्मा रामप्पा कुंभार अर्थात बरम्माप्पा कोट्याळकर या चित्रकारास व मूर्तीकारास बाळासाहेबांनी पुढे आणले. कोट्याळकर क्लेमॉडेलिंगमध्ये वाक्बगार होते. बर्माप्पा कोट्याळकर सोलापुरातील जिरगे नामक व इतर व्यक्तींच्या सहाय्याने चित्रे काढत. पडद्याचे रंगकाम करीत. तसेच यात्रेतील हलत्या चित्रांची प्रदर्शने भरवीत. बाळासाहेबांनी त्यांना औंधला बोलाविले. त्यांच्याकडून गणपती, रामपंचायतन, महिषामर्दनी वगैरे चित्रे १९१९ मध्ये काढून घेतली. बाळासाहेबांनी कोट्याळकरांकडून गीतेतील विभूतियोगाची चव्वेचाळीस चित्रे, गजगौरीव्रताची दहा चित्रे काढून घेतली. आजही ती औधमधील श्री भवानी चित्रसंग्रहालयात पहावयास मिळतात, त्यांनी स्वतः चित्रकलेवरील अनेक ग्रंथांचे लेखन केले होते. तसेच सचित्र अल्बमही प्रकाशित केले होते. यामध्ये प्रामुख्याने १. चित्ररामायण, २. अजिंठा, ३. श्री शिवाजी अल्बम इ यामध्ये त्यांची स्वत:ची चित्रे आहेत. त्याशिवाय श्री. हळदणकर, केतकर, चाफळकर, रा.ब.पुरंदरे यांचीही चित्रे आहेत. तसेच महाभारत, श्रीभवानी सहस्त्रनाम या ग्रंथातही त्यांनी चित्रे काढली आहेत. जगातील अनेक राष्ट्रातील चित्रकलेवरील वाङ्मय त्यांच्याकडे होते. रा. ब. धुरंधर, बाबूराव पेंटर, हळदणकर व इतर नामवंत चित्रकार नेहमीच औंधला येत असत. केशव देशपांडे हे एक कर्नाटकातील उत्तम चित्रकार होते. मात्र परिस्थिती गरीब असल्याने त्यांना अनेक अडचणी

होत्या. त्यांनाही बाळासाहेबांनी आश्रय दिला. केशव देशपांडे मारबलवरील उत्तम कोरीव काम, हस्तिदंत व मौल्यवान जडजवाहिरावर कोरण्याचे कार्यही करीत असत."

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी चित्रकला व शिल्पकला यांचा व्यासंग जपण्यासाठी स्वतंत्र इमारत बांधली होती. त्या इमारतीमध्ये अनेक प्रसिद्ध चित्रकारांच्या कलाकृतींचा ठेवा त्यांनी जतन करून ठेवला होता. यामध्ये स्वतः बाळासाहेबांनी चित्रांकित केलेली अनेक रंगचित्रे आहेत. याशिवाय राजा रविवर्मा, पंडित सातवळेकर, मुल्लर, हळदणकर, ठाकूरसिंग, बाबूराव पेंटर आदींच्या उत्कृष्ट चित्रकृतींचा समावेश आहे. बाळासाहेबांना राजा रविवर्मा यांचाही प्रदीर्घ सहवास लाभला होता. बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी काढलेली अजिंठा येथील लेणी क्रमांक १, २, १६ व १७ मधील ५७ चित्ररंगाचा समावेशही औंध गॅलरीत आहे. सुप्रसिद्ध व दुर्मीळ 'मोनालिसा' रंगचित्राची प्रतिकृतीही येथे प्रदर्शित केलेली आहे.बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी रंगीत चित्रांची उत्कृष्ट छपाई करण्याकरिता औंध येथे स्वतंत्र छापखाना स्थापन केला होता. त्यावर देखरेख ठेवण्यासाठी चौधरी नामक एक बंगाली तंत्रज्ञानाची नेमणूक केली होती. याच चित्रमुद्रणालयातून चित्ररामायण, अजंठा, वेरूळ आणि शिवचरित्र चित्रावली हे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत." महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यास त्याची एक चित्रकला शाखा औंध येथे व्हावी अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी ते आपला चित्रसंग्रह व पुस्तकसंग्रह त्या विद्यापीठास देण्यात तयार होते."

**शिल्पकलेस प्रोत्साहन :**

बाळासाहेब पंतप्रतिनिधींना शिल्पकेची आवड होती. बाळासाहेबांनी अनेक प्रसिद्ध मूर्तीकार, चित्रकार, कुंभार, बुरूड वगैरेंना राजाश्रय दिला होता. नामवंत मूर्तीकार दादोबा पाथरवट व त्यांचे दोन मुलगे महादेव व राजाराम यांना प्रोत्साहन देऊन औंधमध्ये स्टॅच्युअरी डिपार्टमेंटच सुरू करण्यात आले होते. या विभागात दगडाच्या कोरीव मुर्ती, पुतळे व कुशल हस्तीदंताचे काम चालत असत. या कलाकुसरींच्या वस्तुना मोठ्या प्रमाणावर मागणी होती. तसेच अतिशय, उत्तम असे मारबल इटलीमधून आणले जाई व अनेक उत्तम पुतळे घडविले जात. जांब येथील रामदास यांची मुर्ती, पुणे स्टेशन समोरील प्रिन्स ऑफ वेल्स याचा अर्धपुतळा, पुण्याची मार्केटमधील विष्णूशास्त्री चिपळूणकरांचा पुतळा, अनाथ विद्यार्थी गृहातील वीर रामाची मूर्ती, इंदूर येथील गोपालकृष्णाची, नाशिक येथील सूर्यनारायणाची तसेच औंधमधील दत्तमूर्ती, रामपंचायतन, शिवपंचायतन आदी अनेक पुतळे, मूर्ती येथेच तयार करण्यात आल्या होत्या. बाळासाहेब दरवर्षी कला, शिल्प, प्रदर्शने औंधमध्ये भरवीत, यातून अनेक उत्तम कलावस्तू ते विकत घेत.

वस्तुसंग्रहालयाची स्थापना :

बाळासाहेबांनी भारतातील चित्रकार, राजेरजवाड्यांकडून भारतीय जुना चित्रसंग्रह खरेदी केला. तसेच परदेशपर्यटन करून पाश्चात्य चित्रकारांची चित्रे व काही दुर्मिळ चित्रांच्या नकला करवून आणल्या, तसेच अनेक ऐतिहासिक दुर्मिळ वस्तू जमा करण्याचा छंद ही त्यांना होता. देश-परदेशातील अनेक दुर्मिळ वस्तू त्यांच्याकडे होत्या. या संग्रहासाठी १९३६-३७मध्ये श्री भवानी वस्तुचित्र संग्रहालयाची त्यांनी स्थापना केली. यामध्ये प्रामुख्याने १.प्राचीन भारतीय चित्रकला जयपूर शैले कांगडा शैली गढवाल, पंजाब, मोगल, महाराष्ट्र तसेच मोगल काळातील उर्दू हस्तलिखिते, मराठा व पेशवा काळातील सचित्र पोथ्या व जुने संस्कृत ग्रंथ. २. आधुनिक भारतीय चित्रकला या विभागात राजा रविवर्मा, आबालाल रहिमान, मुल्लर, बाबूराव पेंटर, रा. ब. घरघर, हळदणकर, यासारख्या जुन्या तसेच अलीकडील अनेक श्रेष्ठ चित्रकारांच्या तैल रंगातील व जलरंगातील चित्रे तसेच नंदलाल बोस, अवनींद्रनाथ टागोर यासारख्या अनेक चित्रकारांची बंगाल शैलीतील चित्रे आहेत. ३. युरोपियन चित्रे : या विभागात गेल्सबरो, अँद्रेला डेलसार्टी, मायकेल अँजेलो, लिआनार्दो दाव्हिन्सी, मुरिल्लो, राफेल, रेम्ब्रांट, गोया, व्हानडीक अशा प्रसिद्ध चित्रकारांच्या प्रतिकृती, तैल व जलरंगातील वस्तुचित्रे, निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे आहेत. त्याप्रमाणे याशिवाय अजंठा चित्रांचे दालन व बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे रामायणावरील चित्रांचे दालन, तसेच जुन्याकाळातील शिल्पांचे अवशेष आहेत. पितळी व ब्रांझच्या प्रतिमा आहेत. हस्तकौशल्य विभागात चांदीचे, चंदनाच्या लाकडावरील कोरीव काम, तसेच महादबा पाथरवट यांचे हस्तीदंतातील कोरीव काम, 'बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी केलेल्या कष्टामुळेच महाराष्ट्रातील चित्रकार वर्गास संघटनात्मक स्वरूप प्राप्त झाले. शिल्पकला व चित्रकला यातील वेगवेगळया प्रकाराचे दिग्दर्शन होईल, असा मोठा संग्रह अवघ्या महाराष्ट्रात औंध येथील श्री भवानी म्युझियममध्ये आहे. हे कार्य बाळासाहेबांचे चित्रकार व कलाप्रेमी जनतेवर मोठेच ऋण आहे.' बाळासाहेब पंतप्रतिनिधीनी भावी पिढीस दिलेला हा सांस्कृतिक कला-शिल्पांचा वारसा अतिशय महत्त्वाचा असल्याने व संस्थानच्या विलीनीकरणानंतर श्री भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, पुराभिलेख व पुरातत्त्व विभाग,

महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणाखाली आहे. हजारो पर्यटक, विद्यार्थ्यांच्या सहली, जगभरातील हौशी पर्यटक, चित्रकार, भक्त आदि लोक मोठ्या प्रमाणावर या संग्रहालयास भेट देत असतात. वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व मानवी इतिहासात महत्त्वाचे असते, यामुळे प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा समजून घेता येतात.याची जाणीव बाळासाहेबांना असल्याचे स्पष्ट होते. प्राचीन भारतीय परंपरा अभ्यास केवळ कागदपत्रांच्या साहाय्यनेच अभ्यासता येतात असे नव्हे तर त्या इमारती, नाणी, शिलालेख, हत्यारे व विविध पुरातन वस्तुद्वारे त्याची ओळख होते. संग्रहालये ही राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख म्हणून महत्त्वाची असतात. त्यातून राष्ट्रीयत्वाची भावना वाढीव लागते. सामाजिक प्रगतीचे विविध काळातील टप्पे संग्रहालयातून समजतात. याच भूमिकेतून औंध येथे बाळासाहेबांनी संग्रहालयाची स्थापना केली आहे. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा आणि त्यामधील विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी हे चित्र आणि वस्तू संग्रहालय अत्यंत महत्वाचे आहे.भारतीय ज्ञान परंपरांचे महत्व बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी यापूर्वीच जाणले असल्याचे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या धोरणातून सिद्ध करता येते.

**संगीत, नाट्य, किर्तन / पारंपारिक कलांना प्रोत्साहन :**

बाळासाहेब पंतप्रतिनधींनी अनेक पारंपारिक कलांना प्रोत्साहन दिले. संगीत, नाट्य, किर्तन, शाहिरी, लोकगीते आदी पारंपारिक कलांचे ते चाहते होते. ते स्वतः उत्कृष्ट किर्तनकार होते.. त्यांनी किर्तनावर अनेक पुस्तुके छापली होती. किर्तनसुमनहार त्यापैकीच एक होते. मुंबई येथे झालेल्या किर्तनकारांच्या परिषदेचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले होते.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी संगीत नाट्य प्रेमी होते. सन १९४० पासून औंध येथे त्यांनी शिवानंद स्वामींच्या स्मृतीप्रित्यर्थ संगीत महोत्सव सुरू केला. हा महोत्सव औंध संगीत महोत्सव म्हणून ओळखला जातो. सन १९९० मध्ये या महोत्सवाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे झाले. आजही हा महोत्सव प्रतिवर्षी औंधमध्ये आयोजित केला जातो. औंधला चित्र, शिल्प, नृत्य, नाटक अशा अभिजात कलांचा वारसा बाळासाहेबांमुळे मोठ्या प्रमाणात लाभला.गायनाचार्य अनंत मनोहर जोशी यांच्यासारखे गायक औंध दरबारी होते. त्यांना बाळासाहेबांनी आश्रय दिला होता.

**प्राचीन योगाभ्यास :**

सूर्यनमस्कार हा व्यायामाचा एक प्राचीन भारतीय प्रकार आहे. स्वतः बाळासाहेब दररोज ३०० सूर्यनमस्कारांचा व्यायाम करत असत. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी आपल्या संस्थानातील सर्व शाळांमधून सर्व विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार हा व्यायाम सक्तीचा केला होता. यासदंर्भात फेब्रुवारी १९२२ मध्ये औंध संस्थानने एक आदेश काढून त्यानुसार शाळेतील सर्व विद्यार्थ्यांकडून पंधरा मिनिटे सूर्यनमस्काराचा व्यायाम करून घ्यावा, यावरून बाळासाहेब शाळेतील मुलांच्या आरोग्याबाबत किती दक्ष होते हे दिसून येते. तसेच भारताच्या प्राचीन योगशास्त्राविषयी त्यांची तळमळ यामधून स्पष्ट होते.

सन १९२४ पासून त्यांनी संस्थानातील सर्व शाळांना हा व्यायाम सक्तीचा केलेला होता. सूर्यनमस्काराची वार्षिक परीक्षा घेतली जात व यामध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यास इतर विषयात पास होऊन देखील त्याच वर्गात ठेवले जात असे. " औंध संस्थानातील प्रत्येक शाळेत मुलांच्या शारीरिक प्रगतीचे रेकॉर्ड ठेवले जात असे. यावरून सूर्यनमस्काराचा व्यायाम सुरू करण्यापूर्वी त्या मुलाची उंची, वजन व छाती किती होती. आणि यावरून सूर्यनमस्काराचा व्यायाम सक्तीचा केल्यामुळे विद्यार्थ्यांची खूपच चांगली शारीरिक प्रगती झालेली होती. असे दिसून येत असे. यातील ठळक वैशिष्ट्य म्हणजे सूर्यनमस्कार व्यायामामध्ये प्राविण्या मिळविणाऱ्या मुलांना बाळासाहेबांनी मोफत दूध पूरविण्याची योजना १९३६ पासून सुरू केली होती. किमान ३० ते ३५ विद्यार्थी याचा लाभ घेत होते." शाळा-शाळांमधून सूर्यनमस्काराच्या स्पर्धा परीक्षा घेण्याचे धोरणही त्यांनी राबविले होते. संस्थानाबाहेर संपूर्ण सातारा जिल्ह्यामध्येही अशा प्रकारच्या स्पर्धा होत असत. अशाप्रकारे सूर्यनमस्काराची चळवळ विस्तारित, व्यापक व्हावी यासाठी बाळासाहेबांनी अथक प्रयत्न केले.

औंध संस्थानाचे उत्पन्न अत्यल्प असताना भांडारकर प्राच्याविद्या संशोधन मंदिराच्या महाभारत संशोधन कार्यास, एक लाख रुपयांची देणगी देवून आपल्या औदार्याचा उच्चांक गाठला, भांडारकर संस्थेने कृतज्ञता म्हणून महाभारताची 'उद्योगपर्व' ही आवृत्ति बाळासाहेब पंतप्रतिनिधींना अर्पण केली होती. एवढेच नव्हे तर बाळासाहेबांनी या ग्रंथातील चित्रे काढण्याचे कार्य स्वतःच्या देखरेखेखाली पूर्ण केले. चित्रांना अनुकूल असे प्रसंग, चित्रांत यंणाऱ्या व्यक्तींचे स्वरूप, त्यांची वस्त्रे अलंकार याची माहिती महाभारतातून घेऊन त्यांनी हे कार्य पूर्ण केले.

**उपसंहार :**

बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी चित्र-शिल्प, साहित्य, क्रीडा इत्यादी क्षेत्रात मौलिख कार्य केले आहे. चित्रकलेच्या भक्तीमुळेच त्यांनी आपल्या संस्थानातील अशिक्षित पण जन्मतः कलागुणांचे लेणे चढवून आलेल्या कलावंतांना मोठे केले.

चित्रकलेच्या माध्यमातून राष्ट्रीयता, राष्ट्रकल्याण या भावना वाढतात. याची जाणीव बाळासाहेबांना होती.तसेच प्राचीन भारतीय विद्या आणि ज्ञान परंपरा मोठ्या प्रमाणावर विकसित झाल्याचे दिसून येते. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीमुळे औंध संस्थान व आजच्या सातारा-सांगली परिसरात अनेक साहित्यिक, चित्रकार, संगीतकार निर्माण झाले. सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, मुकुंदराव किर्लोस्कर, शाहीर शंकरराव निकम, साने गुरुजी आदी व्यक्ती औंधमध्येच शिकले होते. क्रीडा व सांस्कृतिकदृष्ट्या बाळासाहेबांचे कार्य अतुलनीय आहे. सूर्यनमस्कार, व्यायाम पद्धतीला पाठबळ संस्थांनी प्रदेशात भवानी वस्तुसंग्रहालयासारखे संग्रहालय महाराष्ट्रात अन्यत्र कुठेही नाही. देश-परदेशातून हजारो पर्यटक त्यास भेट देतात. देशी-परदेशी हौसी चित्रकार तिथे येऊन अभ्यास करतात. त्यांचे हे योगदान भावी पिढीसाठी प्रेरणा देणारे अत्यंत महत्वाचे आहे. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सुमारे शतकापूर्वी भारताच्या या ज्ञान परंपरा किती महत्वपूर्ण आहेत आणि त्यांचा अंगीकार करणे कसे आवश्यक आहे, याचा विचार करून संपूर्ण संस्थानात त्याची अंबलबजावणी केली. आज भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० अंतर्गत या ज्ञान परंपरा अभ्यासक्रमात समाविष्ट केल्याचे दिसून येते. यामधून त्यांच्या या कृतीपाठीमागे व्यापक विचार आणि कृतीशील दृष्टीकोन असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. औंध संस्थान प्रशासन अहवाल १९०९-१०, १९२१-२२, १९३७-३८, १९३९-४०, १९३९-४०,१९४३- औंध स्टेट गॅझेट, १९२५,

२. चापेकर ना.गो,(संपा) गौरव ग्रंथ मंडळ ,श्री.भवानराव गौरव ग्रंथ भाग १ व २ औंध स्टेट प्रेस,१९३५

३. चित्राव सिद्धेश्वर शास्त्री (संपा.), 'भारतवर्षीय अर्वाचीन चरित्र कोश', समर्थ भारत, पुणे १९४०,

४. पंत अप्पा, मुलखावेगळा राजा,मान-सन्मान प्रकाशन पुणे ,१९८६.

५. पंत बाळासाहेब, 'आत्मचरित्र', औंध स्टेट प्रेस, १९४६

६. पंत बाळासाहेब, 'अध्यक्षांचे भाषण' मराठी साहित्य संमेलन १९३५ इंदूर

७. पंत बाळासाहेब, 'पुरोगामी व्हा, नवचैतन्य द्या', दै. लोकसत्ता, २६/६/१९४०

८. पंत बाळासाहेब, 'अजंठ्याची अमर कलाकृती', दै. अग्रणी, २२ नोव्हेंबर, १९३९

९. रोदरसुंड इंदिरा, दि औंध एक्सपरिमेंट, ए गांधीयन ग्रासरूट डेमोक्रॅसी ओरीएंट लॉंगमन पब्लिकेशन्स मुंबई Mumbai,१९८३

१०. किर्लोस्कर जीवन (संपा.), स्मृतिग्रंथ,

११. गोखले पु. पा., स्मृतिग्रंथ, उपरोक्त लेख, 'श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींची वाङ्मयी पूजा

१२. गॅझेटिअर, सातारा जिल्हा, महाराष्ट्र राज्य, १९९९

१३. देशपांडे वाग्भट नारायण, 'स्फूट लेख संग्रह',

१४. दै.संस्थानी स्वराज्य, 'महाराष्ट्र', दि. १२/७/१९४०, दै. ज्ञानप्रकाश, 'उद्योगपर्व', औंधच्या राजेसाहेबांना समर्पण, दि. ९ जुलै १९४०

१५. पुरुषार्थ मासिक, नोव्हेंबर १९२९,

१६. दै. ज्ञानप्रकाश, 'महाराष्ट्र भवन निधी समिती, दिल्ली, दि. १३/६/१९४०


❑❑❑

इतिहास-पुरुष

॥ नामूलं लिख्यते किंचित् ॥

**अखिल भारतीय इतिहास संकलन योजना**

**बाबा साहेब आपटे स्मृति भवन, 'केशव कुञ्ज', झण्डेवाला, नयी दिल्ली– ११० ००५**

**AKHIL BHARATIYA ITIHASA SANKALANA YOJANA**

Baba Saheb pte Smriti Bhawan, 'Keshav Kunj', Jhandewalan, New Delhi-110 005

ISSN 0974-3065